१४) पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविणेबाबत स्त्रोत बळकटी करण्याकरीता दिलेल्या योजनेप्रमाणे व्यवस्था करावी. अन्यथा आपणास इमारत वापर परवाना मिळणार नाही.

१५) रूफस्टाप रेन हार्वेस्टिंगची व्यवस्था प्रमाणित करावी तसेच सौर उर्जेवर पाणी तापविण्याचा पध्दतीचा वापर करावा.

१६) भुकंप प्रतिबंधक उपायोजना करून (नोंदणीकृत स्ट्रक्चरल) इंजिनिअर कडुन आ.सी.सी. डिझाईन करून घेणे व तसे प्रमाणपत्र नगर परिषद कडे सादर करणे बंधनकारक राहील. तसेच सदर इमारतीचा पुर्णत्वाचा दाखला घेण्यापुर्वी structural stability बाबत नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१७) महाराष्ट्र अग्निशमन अधिनियम 2006 व नियम 2009 नुसार प्रत्यक्ष साईटवर अग्निशमन व्यवस्था करून दयावी लागेल. तसेच त्याबाबतचे प्रमाणपत्र अग्निशमन विभागाकडुन प्राप्त करून संबंधितास सादर करने बंधनकारक राहील.

१८) चांगल्या दर्जाची फ़्लॅश ॲश विट चा वापर बांधकामाकरिता करणे आवश्यक आहे.

१९) इमारतीवर मोबाईल टॉवरचे बांधकाम परवानगी शिवाय करता येणार नाही.

२०) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर आवेदकाने इमारत बांधकाम पुर्णत्वाचे (completion certificate) प्रमाणपत्र देवून Occupancy certificate घेणे बंधनकारक राहील.

२१) इमारतीच्या प्रत्येकी 10 मीटर अंतरावर 1 वृक्ष असे एकुण 2 वृक्ष तसेच समोरील रस्त्याचे भागात 2 वृक्ष रोपण करणे त्याची देखभाल करणे बंधनकारक आहे.

सुचना

१) संदर्भाधिन इमारत परवाना व आरंभ प्रमाणपत्राची मुदत आपणास प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या दिनांकापासुन एक वर्ष पर्यंत वैध आहे. अर्जदारास मुदतीचे दोन महिने अगोदर अर्जदारास पुढील एक वर्षाचे नुतनीकरण करण्याकरिता विहीत नमुन्यात नगरपालिकेत अर्ज करणे आवश्यक आहे.

२) आपण नगर पालिकेत जमा केलेली अमानत रक्कम मंजुर नकाशात प्रारंभ प्रमाणपत्रातील अटीप्रमाणे बांधकाम करणार असल्याची पावती देणे अन्यथा, नगर पालिकेचे पूर्व परवानगिशिवाय आपण बांधकामात केलेले फेरवबदल इत्यादी आपली अनामत रक्कम नगरपालिकेचे खाती वळती/जमा होईल.

३) नगरपालिकेने मंजुर केलेल्या बांधकामातील पूर्व परवानगी न घेता केलेले फेरबद्ल हे अवैध व अनधिकृत राहतील, त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 आणि महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 चे अंतर्गत असणा–या तरतुदीनूसार कायदेशिर कार्यवाहीस्तव प्रस्तावित करण्यात येईल. कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

कार्यालयाचा शिक्का :

मुख्याधिकारी
नगर परिषद, वर्धा

आदेश कमांक :–
दिनांक :–

सहपत्र : १) मंजुर बांधकाम नकाशाची 1 प्रत

२) सुचना फलकावर नमुद करावयाच्या माहितीचे पत्रक

प्रत माहितीस्तव सादर :

१) कर अधिक्षक, नगर परिषद , वर्धा
यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव